शार्कच्या दाताचा शोध



अंजूनी तिच्या पायाची बोटे ओल्या वाळूत खुपसली. वाळू मागेपुढे करून तिने नीट पाहिले. गेला आठवडाभर दररोज सकाळी ती समुद्राच्या किनाऱ्यावर शार्कचे दात शोधत होती. सगळे जण म्हणायचे की मर्टल बीचवर शार्कचे दात सहज सापडतात. पण अंजूला मात्र अजून एकही सापडला नव्हता.

अचानक तिला वाळूत काहीतरी दिसले. तिने पटकन जाउन ती वस्तू उचलली. पांढऱ्या रंगाची, त्रिकोणी आणि टोकदार. शार्कचा दात? पण अंजूला खात्री नव्हती. तो खरच दात होता का साधा शिंपला होता?

तेवढ्यात अंजूचा बाबा तिथे आला. "काय, सापडला का शार्कचा दात?" त्यानी विचारले.

अंजूने तिला सापडलेली वस्तू बाबाला दिली. "दात आहे का साधा शिंपला ते माहिती नाही."

"बघू बरं." बाबानी तिच्या हातातली वस्तू घेतली. त्यानी नीट निरखून पाहिले. तो म्हणाला, "असेल सुद्धा कदाचित हा शार्कचा दात."

अंजू म्हणाली, "कदाचित नको. मला इथून आठवण म्हणून काहीतरी घेऊन जायचे आहे. आणि त्याबद्दल मला नक्की माहिती पाहिजे. काही शंका नको."

बाबा म्हणाला, "ठीक आहे. मी जरा लोकांना विचारतो." बाबा ती वस्तू घेऊन निघून गेला. अंजू पुन्हा एकदा किनाऱ्यावर शार्कचा दात शोधायला लागली.

"अंजू, लवकर चल. जायची वेळ झाली." थोड्या वेळानी अंजूच्या कानावर तिच्या आईची हाक पडली.

"आई, जरा थांब गं. मला आणखी थोडा वेळ शोधू दे." अंजू आईला म्हणाली.

"अंजू, बाळा आपल्याला जेवायला जायचे आहे. आणि अशी वाळूत माखलेली जाणार का? आधी तुला अंघोळ करायला लागणार आहे." आईनी तिला आठवण करून दिली.

आज सहलीचा शेवटचा दिवस होता. आज जर दात सापडला नाही तर अंजूला दुकानातून घेतलेल्या दातावरच समाधान मानावे लागणार होते. त्यामुळे तिला आणखी थोडा वेळ तिथे थांबायचे होते. पण नाईलाजानी अंजूला परत जावेच लागले.

सगळे आवरून ती जेवायला जायला तयार झाली. तेवढ्यात बाबा तिथे आला. तो म्हणाला, "मी खूप लोकांना विचारले. आपण ज्या दुकानातून शार्कच्या दाताची माळ घेतली, तिथे सुद्धा जाऊन मी विचारले. ते म्हणतायत की हा खरा शार्कचा दात दिसतोय."

अंजूचा चेहरा एकदम खुलला. आता तिला आठवण म्हणून खरा खुरा शार्कचा दात मिळाला होता. तोसुद्धा स्वतः शोधलेला - दुकानातून विकत घेतलेला नाही.

- केली हाश्वे (अनुवाद: सुजित उपाध्ये) त्रिवेणी मराठी शाळा.

१. ही गोष्ट कुठे घडली आहे?

---

२. खालील वाक्यांपैकी खरे वाक्य निवडा.
अ) अंजूकडे आधीच एक शार्कचा दात होता.
आ) अंजू किनाऱ्यावर शिंपले शोधत होती.
इ) अंजूने शार्कचा दात कधीच पहिला नव्हता.
ई) अंजू आणखी दोन दिवस मर्टल बीचवर राहणार होती.

३. खालील शब्द वापरून वाक्य तयार करा.
खुपसणे, सापडणे, निरखून, शंका, समाधान, नाईलाज

४. "आठवण" हा शब्द गोष्टीत दोन अर्थांनी वापरला आहे. प्रत्येक अर्थाचे एक वाक्य शोधून लिहा.

५. तुम्ही आठवण म्हणून आणलेल्या एका वस्तूची माहिती सांगा. तुम्ही ती वस्तू कोठून आणली? ती वस्तू आठवण म्हणून तुम्हाला का आवडली?